**स्पेशल दिवाणी मुकदमा क्रमांक १७७/२०२५ मधील निशाणी २२ वरील आदेश.**

(कुंडलिक खोत वि. प्रकाश विरपन्ना चांभार कांबळे वैगेरे)

(CNR No-MHSN02-001138-2025)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी २ ते ४ यांनी निशाणी क्रमांक १ कडे त्यांच्या विरुध्द झालेला 'विना म्हणणे' हुकूम रद्द होवुन म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२. प्रस्तुत कामाची नोटीस प्रतिवादीस दिनांक ०८/०८/२०२५ रोजी बजावली आहे व दिनांक ०९/०९/२०२५ रोजी प्रस्तुत प्रतिवादी हे वकीलांमार्फत हजरही आहेत. परंतु प्रतिवादी क्र. २ या वयस्कर असुन त्यांचा मुलगा प्रतिवादी क्र. १ हे आजारी होते. प्रस्तुत प्रतिवादीस घर चालविण्याकरिता कामाला जावे लागते व कामावर सुट्टी टाकणे हे आर्थिक दृष्टया न झेपणारे असल्याने प्रतिवादी क्र. २ यांना सदर दाव्यास कैफियत देण्यास उशीर झालेला आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दिनांक ०७/१०/२०२५ रोजी विना म्हणणे आदेश झालेला आहे. तसेच प्रतिवादी क. ३ ते ४ या सांगली येथील रहिवाशी नसल्याने व सदर नोटीस दाव्याची व ताकीद अर्जाची प्राप्त झाल्यानंतर सदर कामातील प्रतिवादींनी याबाबतची माहिती स्वतःच्या आईला देऊन मांडण्यास सांगितले व दरम्यान प्रस्तुत प्रतिवादी हे. परगावी घरगुती कारणामुळे गेली असल्याने या कामी म्हणणे देणे शक्य झाले नाही. सबब, त्यांच्या विरुध्द झालेला 'विना म्हणणे' रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी निशाणी ३२ कडे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. वादी यांचे असे म्हणणे आहे की, अर्जात दिलेले कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४

हे या कामी संगणमताने सदरचे कामकाज चालविणेस टाळाटाळ करत आहेत. सबब, प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा हा करारपत्रावरुन खरेदीपत्र होऊन मिळणेकरिता तसेच निरंतर ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. परंतु, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना वारंवार संधी देऊनही त्यांनी म्हणणे दाखल केले नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द ''विना म्हणणे'' आदेश पारीत झाले आहेत. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे त्यांना कामाला जावे लागत असल्यामुळे म्हणणे सादर करता आले नाही. प्रतिवादी यांना त्यांचा बचाव मांडण्याची संधी मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. दावा गुणदोषावर चालवुन पक्षकारांमधील मधील सर्व वादप्रश्न निकाली काढण्यास न्यायालयासही मदत होईल. प्रस्तुत प्रतिवादी यांना निश्चितच म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणुन म्हणणे नाकारणे न्यायोचित होणार नाही. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आदेश** ::

अर्ज (निशाणी २२) मंजूर करण्यात येत आहे.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2026.03.12 18:00:13 +0530

सांगली. ( विभा प्र.गायकवाड)

दि. ११/०३/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.